**नियमित फौजदारी खटला नं. १६८५/२०२५**
**नि. क्र. १**

**फिर्यादी यांची शपथेवर पडताळणी.**

नाव : हिमांशु सुर्जितकुमार रत्ता.
वय : ३९ वर्षे, व्यवसाय : खाजगी नौकरी ,
राहणार : ए—६०३ गंगा इस्टोरीया कडनगर उंड्री, पुणे.

मी ज्या सोसायटीमध्ये राहतो तेथे पल्लवी गुप्ता आणि त्यांचे पती मोहीत भाटीया हे सुद्धा राहतात. त्यांचे आणि आमचे चांगले बोलणे चालणे असायचे. दि १७.०७.२०२५ रोजी मोहित भाटीया यांच्या मुलाचा वाढदिवस होता. त्यावेळी माझी आई व माझी बहिण प्रथम वाढदिवसाला गेले होते आणि नंतर मी वाढदिवसाला गेलो होतो. माझया बहिणीसमोर पल्लवी गुप्ता यांनी कोणालातरी फोन लावला आणि ती फोन वरती त्यांना सांगत होती की, काही लोक वाढदिवसाला बोलवले नाही तरी सुद्धा येतात काहीही न आणता. त्यावेळी माझी बहिण तेथे रडायला लागली. त्यानंतर मी पल्लवी गुप्ता हीला विचारले की तु माझया बहिणीला असे का बोलली. तेव्हा ती मला बोलली की, मी तुम्हाला नाही बोलले तीला बोलले तर मग काय झाले. त्यानंतर पल्लवी हीने मला शिव्या दयायला लागली तीने मला बहिणचोद असे म्हणून शिवी गाळ केली. त्यावेळी तीला बोलली की, असे कुठे बोलणे असते का, त्यानंतर तीने मला तुमचे कुटूंब हे असेच आहे. मी त्यावेळी तीला बोललो की आम्ही खाली हात आलो नाही माझया आईने तुमच्या पतीच्या अकाउंटला पाच हजार रुपये ट्रान्सफर केलेले आहेत. त्यावेळी मोहीत भाटीया हा तिथे आला त्याने मला सांगितले की त्याने माझी माफी मागितली आणि जाउदया असे बोलले. त्यानंतर पल्लवी तेथे बोलत होती की मी तुमच्या विरुद्ध पोलिस तक्रार करेन त्यानंतर मी माझया कुटुंबाला घेउन तेथून निघून आलो.

त्यानंतर दि १९.०७.२०२५ रोजी पल्लवी ही उंड्री पोलिस स्टेशन येथे गेली. तिथल्या पोलिसांनी माझया आईला फोन लावला आणि वाढदिवसाला झालेल्या घटनेबाबत विचारणा केली. त्यावेळी माझया आईने माझा मोबाईल नं पोलिसांना दिला आणि त्यांना सांगितले की जे काही विचारायचे आहे ते तूम्ही त्याला विचारा. त्यानंतर पोलिसांचा मला फोन आला. पोलिसांनी मला फोन वरती मोठया आवाजात मला बोलले की, तु महिलांसोबत गैरवर्तणुक कशी केली ती तुमच्या विरुद्ध तक्रार देण्यासाठी आलेली आहे. मी पोलिसांना वाढदिवसाच्या दिवशी झालेल्या घटनेबाबत सविस्तर सांगितलो आणि त्यांना विचारलो की पल्लवी हीचे पती हे तीच्यासोबत आले आहेत का त्यावेळी त्यांनी नाही म्हणून सांगितले. त्यानंतर पोलिसांनी असेही मला फोनवर सांगितले की पल्लवीचे पती हे तूमच्याकडे आले, तेव्हा तूम्ही त्याचे ब्रेन वॉश करतात. त्यानंतर पोलिसांनी मला सांगितले की त्यांनी पल्लवीला समजून सांगितले आहे. ते आता तूमच्या घरी येणार नाही. त्यानंतर दोन दिवसांनी सोसायटीच्या लोकांना पल्लवी ही आमच्या कुटूंबाबाबत

काहीही बोलत होती. त्यानंतर मी वकिलांमार्फत पल्लवी यांना नोटीस पाठवली. पल्लवी यांनी सदर नोटीसला कोणतेही उत्तर दिले नाही. त्यानंतर मी सदरची फिर्याद न्यायालयात दाखल केली.

..................

हिमांशु सुर्जितकुमार रत्ता

दिनांकः— १०.११.२०२५

श्रवणोत्तर स्विकृत.

10.11.2025

( पी. बी. भगपुरे )

२रे सह प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी

लष्कर न्यायालय, जि. पुणे